शुक्रवार ३१ जानेवारी २०२५

नम्रता आणि सद्गुणांनी जीवन अधिक सुंदर होते.

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक : १३६ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# सिंदखेड राजा तालुक्यांतील अतिक्रमण करून शाळा बांधणाऱ्या, खाजगी शैक्षणिक संस्थांच्या अडचणीत वाढ

## अन्यथा तहसील कार्यालयासमोर रामदास कहाळे करणार आमरण उपोषण

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**सिंदखेड राजा (ज्ञानेश्वर बुधवत)**

प्रधानमंत्री घरकुल योजना तालुक्यात जोरात सुरू असून काही घरकुल धारकांना घरे बांधण्यासाठी जागाच नसल्याने ते घरकुलाच्या लाभा पासून वंचित राहत असल्याचे दिसून येत आहे. एकीकडे हेक्टर ने जमिनी संस्थानी बळकावून त्या मध्ये तालुक्यातील खाजगी शैक्षणिक संस्थांनी अनेक ठिकाणी शाळा महाविद्यालय शासनाच्या जमिनीवर अतिक्रमण करून उभे केले आहे. खाजगी आनुदानित शाळानी अतिक्रमण करून इमारती उभ्या केल्या आहेत.

एकीकडे घरकुल योजनेच्या माध्यमातून अतिक्रमण करणाऱ्या लाभार्थ्यांना महसूल विभाग २० बाय ३० जागा देत नाही. त्यामुळे त्यांना घरकुल योजने पासून वंचित राहावे लागत आहेत.आणि दुसरीकडे महसूल विभागाच्या शासकीय जमिनीवर खाजगी शैक्षणिक संस्थांनी कुठे १ एकर तर कुठे २ ते ३ एकर जागा ताब्यात घेतल्या आहेत. त्या जमिनीवर अतिक्रमण करून इमारती उभ्या केल्या आहेत. त्यामुळे धनदांडग्या संस्थांनीकांना महसूल प्रशासन पाठीशी घालत असून सदर अतिक्रमण करणाऱ्या शाळेचे अतिक्रमण तात्काळ हटविण्यात यावे अन्यथा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल. असे रामदास कहाळे तालुका अध्यक्ष आजाद समाज पार्टी सिंदखेड राजा यांनी तहसीलदार यांना



देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

**तहसिलदारांपुढे नवे आवाहन, काय कारवाई करतील या कडे सर्वांचे लक्षङ्ग धनदांडग्या संस्थांनिकांना महसूल प्रशासन पाठीशी घालत असल्याचा रोख आरोप आजाद समाज पार्टीचे तालुका अध्यक्ष कहाळे यांनी केला आहे. तालुका भर प्रत्येक गावात महसूल ची जमीन असून त्या संस्थानिकांनी बळकावळ्या आहेत हे स्पष्ट असून आता त्यासाठी पहिल्यांदा कोणी तरी आवाज उठवला आहे. तर याकडे मा. तहसीलदार लक्ष घालून काय कारवाई करतील हे बघण्यासाठी तालुक्यातील जनता उत्सुक आहे. महसूल विभागाने केवळ वाळू उत्खन्न करणाऱ्या वाळूमाफियांमध्येच दंग न राहता, याकडे ही लक्ष द्यावे अशी तालुक्यातील जनता अपेक्षा करत आहेत. सिंदखेड राजा तहसिलदारांपुढे आता हे नवे अहावन असून ते या वर काय कारवाई करतील या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

---



## आनंदनगरी उत्साहात साजरी

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**भोकर/माधव नागलवाड**

जि.प.प्रा.शाळा रिठा येथे आनंद मेळावा भरविण्यात आला .या आनंदनगरीचे उदघाटन भोकर येथील नवजीवन हॉस्पिटल चे डॉ. प्रविण पाकलवाड,डॉ. प्रभा केंग्रे पाकलवाड शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती.कमठलवार, व शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष किशन म्हैशनवाड ,साईनाथ इसनकर आधिच्या हस्ते करण्यात आले.आनंदनगरीत बालकांनी ईडली, समोसे,पापड, मिरचीभजे, मुरमुरे,चिवडा, पेढा, टरबूज, जांब, ईत्यादी पदार्थ घरुन बनवून आनली विवीध प्रंकारचे स्टॉल लावले या सर्व खाद्यपदार्थाचा गावातील महिला व नागरिकांनी तसेच शिक्षक वृंदाने ही मनस्वी आंनद घेतला यातुन बालकांनी खरेदी,व्रिकी काय आनंदनगरी आनंद मेळावाच्या यशस्वितेसाठी सहशिक्षक श्री.मुकनवार, श्री.चव्हाण, श्री.हापसे, श्रीमती. प्याधे, श्रीमती. पोपलवार, श्रीमती.शेटलवार, श्रीमती.सोनटक्के,श्रीमती.सावते ईत्यादीने परीश्रम घेतले.

## डॉ.मधुसूदन दिग्रसकर यांची कॅनडातील शासकीय वैद्यकीय क्षेत्रात फिनिक्स भरारी

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**नायगाव माधव बैलकवाड**

नायगाव शहरातील अमृत हॉस्पिटलचे सुप्रसिद्ध डॉक्टर मधुसूदन दिग्रसकर पाटील हे नायगाव तालुक्यासह देगलूर बिलोली मुखेड या तालुक्यातील कित्येक रुग्णावर यशस्वीरित्या उपचार केले,अनेकांना नवे जीवदानही दिले असल्याने अनेक रुग्ण त्यांच्या कार्यप्रणालीवर समाधानकारक होते,परंतु डॉक्टर दिग्रसकर यांनी रुग्णाची सेवा करीत गेल्या तीन वर्षांपूर्वी त्यांनी कॅनडा साठी अर्ज भरलेला होता सदर अर्जाची छाननी लकी ड्रॉ पद्धतीने झाली योगायोगाने ते नशीबवान ठरले त्यांचा लकी ड्रॉ मध्ये नंबर लागल्यामुळे कॅनडामधील शासकीय वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी फिनिक्स भरारी घेतली आहे.ङ्ग प्रगतीच्या उंच उंच शिखरावर जाताना अवघड तेवढेच ठरते पण प्रयत्न केले की ते खूप सोपे होते हे अगदी खरे असलेले तरी मनात जिद्द भरल्यावर त्या दिशेने वाटचाल चालू असावी लागते या दिशेने वाटचाल डॉ.दिग्रसकराची झाली,गेल्या पाच ते सहा वर्षांपासून नायगाव शहरात अमृत हॉस्पिटल मधून एमबीबीएस एमडी मेडिसिन असलेले डॉक्टर मधुसूदन दिग्रसकर पाटील यांनी रुग्णाची नि:सीम सेवा केली आणि कमी कालावधीतच ते हजारो लोकांच्या परिचयाचे झाले, कोरोना हा संसर्गजन्य रोग देशावर थैमान घातला होता अनेक डॉक्टर रुग्णांना जवळ घेत नव्हते तर अनेक डॉक्टरांनी आपले दवाखाने देखील बंद ठेवले होते परंतु या भयावह काळातही डॉ.दिग्रसकरानी रुग्णाची सेवा केली.बिलोली तालुक्यातील बामणी येथील एका रुग्णांना हत्याकचा तीव्र झटका आला त्यांच्यावर यशस्वी उपचार डॉक्टर दिग्रसकरानी करून त्यांना नवे जीवदान दिले.त्या रुग्णांच्या नातेवाईकांनी मनस्वी आभार मानले पण याबद्दल स्वर्गीय खासदार वसंतराव चव्हाण यांनी देखील डॉक्टर दिग्रसकर यांचा सन्मान करून अभिनंदन करीत आपल्यासारख्या डॉक्टरांची नायगाव शहरात नितांत गरज होती. कारण ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांना मोठ्या शहरातले दवाखाने परवडणारे नाहीत असाही अभिप्राय देत त्यांनी शुभेच्छा दिले. व्यक्ती कोणत्याही क्षेत्रातला असो तो ध्येयवादी असला की त्यांची जिद्द आहे त्यावर समाधान न राहता पुढे जाण्याची त्यांच्या अंगी वृती असते



अशी आपल्या अंगी जिद्द असलेले डॉक्टर मधुसूदन दिग्रसकर यांनी कॅनडा देशातील वैद्यकीय क्षेत्रासाठी तीन वर्षापूर्वी अर्ज भरलेला होता तो अर्ज छानणी करून लकी ड्रॉ पद्धतीने काढण्यात आला आणि आपल्या मातापित्यासह अनेक रुग्णाची पुण्याई आशीर्वाद डॉक्टर दिग्रसकर यांच्या पाठीशी असल्याने ते भाग्यवान ठरले आणि कॅनडाच्या शासकीय वैद्यकीय क्षेत्रात त्यांची नियुक्ती झाली असल्याने त्यांना पत्रही प्राप्त झाले, येत्या १६ फेब्रुवारी रोजी डॉक्टर मधुसूदन दिग्रसकर हे आपल्या कुटुंबासह कॅनडा देशात रवाना होणार आहेत कॅनडातील नागरिकत्व देखील त्यांना बहाल झाले आहे असेही ते पत्रकारांशी बोलताना म्हणाले. यावेळी पत्रकारासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून भरभरून शुभेच्छा दिले.

## विमानगराच्या त्या घटनेनंतर महिलांच्या सुरक्षेसाठी पुणे पोलिसांकडून नियमावली जारी.

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**हवेली ( संतोष कदम)**

विमाननगर परिसरातील खासगी कंपनीत काम करणार्या तरुणीचा तिच्याच सहकार्याने धारदार शस्त्राने वार करून खून केला. त्या पार्श्वभूमीवर कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलिसांनी कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.याबाबत पोलिसांकडून एक मार्गदर्शिका (एसओपी) तयार करण्यात आली असून, तिचे पालन करणे सर्व कंपन्यांना बंधनकारक असणार आहे. एवढेच नाही, तर मार्गदर्शिकेचे पालन होते की नाही याची खात्री वेळोवेळी पोलीस करणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली आहे.

येथील आयटी कंपन्यांमध्ये काम करणार्या महिलांची संख्या मोठी आहे. दिवस आणि रात्रपाळी अशा दोन सत्रात या कंपन्यांचे कामकाज चालते. अनेक आयटी कंपन्यांकडून महिलांना प्रवासासाठी कार आणि बस सेवा उपलब्ध करून दिली जाते. दरम्यान, मागील काही वर्षांपूर्वी जोती कुमारी, नयना पुजारी या आयटी अभियंत्या तरुणींवर अत्याचार करून खून झाल्याच्या घटना घडल्या होत्या.माय सेफ पुणे ॲप ते सुरक्षा ऑडिटदहा किंवा अधिक महिला काम करत असलेल्या ठिकाणी महिलांची सुरक्षा आणि समस्या निराकरणासाठी एक अंतर्गत समिती अनिवार्य. त्या समितीमध्ये व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, महिला कर्मचारी आणि सुरक्षेसाठी नियुक्त असलेल्या अधिकार्याचा समावेश असावा.एखाद्या कंपनीत महिला कामगारांची संख्या जास्त असेल त्यांचे सुरक्षा ऑडिट स्थानिक पोलिस ठाण्यांच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना करावे लागणार. पोलीस निरीक्षक, चौकी प्रभारी अधिकारी आणि एचआर व सुरक्षा प्रमुख यांचे व्हॉटस ॲप ग्रुप तयार करावे लागणार. भौतिक सुविधा, आपत्कालीन प्रतिसाद प्रोटोकॉल कर्मचार्यांची जागरूकता या कार्यक्रमाचे आयोजन महत्त्वाचे.प्रवेशाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य, अंधार असलेल्या गल्ल्या, पार्किंगची जागा या ठिकाणी पोलिसांकडून अचानक तपासणी होणार.कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेबाबत जलद आणि सुलभ संवाद व्हावा यासाठी कंपनी सुरक्षा प्रमुख आणि एचआर यांचा व्हॉटस्अप ग्रुप. पोलीस तेथे कसा प्रतिसाद दिला जातो याची खात्री करतील. महिला वर्ग अधिक असलेल्या कंपन्यांची माहिती गुन्हे शाखेने घेण्यास सुरुवात केली आहे. माय सेफ पुणे ॲपचे क्युआर कोड येथे लावण्यात येणार असून, बीट मार्शल नियमित येथे गस्त घालतील.स्थानिक पोलीस ठाण्याकडून कंपनीत सीसीटीव्ही कॅमेर्यांची पाहणी केली जाईल. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून जेथे कॅमेर्याची आवश्यकता आहे, अशा ठिकाणी कॅमेरे बसवण्याच्या सूचना करतील. प्रवेशद्वार, बाहेर पडण्याचा मार्ग, पार्किंग परिसर यावर विशेष लक्ष.कंपन्यांकडून पुरविण्यात येणारी प्रवासी सेवा याचे नियमित ऑडिट करावे लागणार. यामध्ये चालकांची पार्श्वभूमी, वाहनांची देखभाल आणि जीपीएस ट्रॅकिंग प्रणालीचा समावेश करावा लागणार.महिला कर्मचार्यांच्या चिंता आणि भीतीचे मूल्यांकन करण्यासाठी विशेषतः रात्री उशिरा प्रवासाबाबत संवाद सत्रे आयोजित केली जातील.

## राष्ट्रीय मिलिटरी स्कुल प्रवेश परीक्षेत संबोधी मवाडे भारतात दुसरी

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**गेवराई , दि . ३० (प्रतिनिधी )**

राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान संस्थेच्या माध्यमातून ८ जाने २०२५ रोजी भारतातील नामांकित लष्करी शिक्षणासाठी अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या पाच राष्ट्रीय मिलिटरी स्कुलमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी लेखी परीक्षा घेतली होती. या परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोळेगाव ता . गेवराई येथील इयत्ता पाचवीमध्ये शिकणारी विद्यार्थिनी कु.संबोधी सिमा महेंद्र मवाडे हिने मुलींमधून देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. गणित, बुद्धिमत्ता, सामान्यज्ञान व इंग्रजी विषयावर आधारित लेखी प्रवेश परीक्षेत तिने १५० पैकी १३२ गुण मिळवून



घवघवीत यश संपादन केले . पुढील मुलाखती साठी तिची निवड झाली आहे. मुलाखतीनंतर तिला मिलिटरी स्कूलमध्ये इयत्ता सहावीमध्ये प्रवेश मिळणार आहे.

लष्करी शाळांसाठी दरवर्षी डिसेंबरमध्ये प्रवेश परीक्षा घेतली जाते. या परीक्षेला सुमारे ७० हजार ते ८० हजार विद्यार्थी उपस्थित असतात . त्यातून ३५० विद्यार्थी निवडले जातात. राष्ट्रीय मिलिटरी स्कूल हे भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयामार्फत चालवले जाणारे भारतातील शाळांचे नेटवर्क आहे. देशाच्या विविध भागांतील तरुण मुला-मुलींना लष्करी प्रशिक्षणासह दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्देशाने या शाळांची स्थापना करण्यात आली आहे. या यशासाठी सेल्फ स्टडीसोबत सातारा येथील आय कॅन इन्स्टिट्यूटचे फौंडेशन क्लास केले आहेत ,असे तिने सांगितले . यासोबत तिने आपल्या यशाचे श्रेय प्राथमिक शिक्षक असणाऱ्या आपल्या आई-वडिलांना व शाळेतील शिक्षक तसेच आय कॅन इन्स्टिट्यूटच्या सर्व शिक्षकांना दिले आहे.

या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे. गेवराई तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी धनंजय शिंदे, आय कॅन इन्स्टिट्यूटचे संस्थापक ङ्गनवनाथ देशमुख , आयकर अधिकारी गोपाळ गायकवाड, गोळेगावचे सरपंच सिद्धेश्वर काळे, शा.व्य.समिती अध्यक्ष केशव काळे, केंद्रप्रमुख कैलास चव्हाण , जातेगाव केंद्राचे मुख्याध्यापक काळूसिंग सोनवणे ,गोळेगाव शाळेचे मुख्याध्यापक संतोष तुरे , सेलू शाळेचे मु.अ.हिरालाल जाधव आदींनी कु.संबोधीला मुलाखतीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच केंद्रातील शिक्षक आर्दड ,घोडके , सतीश पल्लेवाड ,चव्हाण ,जमदाडे , ओव्हाळ ,पवार मॅडम,ढोकणे ,कारंडे ,भंडारे , वाडेकर ,कुरे यांनी तिचे या यशाबद्दल विशेष अभिनंदन केले.तसेच या यशाबद्दल तिच्यावर जिल्ह्याभरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## तो निर्णय अखेर रद्द; वह्यांची पाने न जोडता पुस्तके होणार वितरित

मुंबई : विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे वजन कमी व्हावे यासाठी माजी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या कार्यकाळात पाठ्यपुस्तकांना वह्यांची पाने जोडण्याचा निर्णय घेण्यात आला होता. याची अंमलबजावणी सर्व सरकारी अनुदानित शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सुरू करण्यात आली होती. मात्र, योजनेचा आढावा घेतल्यानंतर

पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या वह्यांच्या कोऱ्या पानांचा विद्यार्थ्यांकडून अपेक्षेप्रमाणे उपयोग होत नसल्याचे आढळले आहे.

# डॉक्टर, इंजिनिअर बनण्याआधी चांगला माणूस बना ! - डॉ. श्रीहरी बुडगेमवार

लोकनेता न्युज नेटवर्क

**शिवकुमार बिरादार मुखेड**

दि. २७ चिमुकले विद्यार्थी हे या देशाचे उद्याचे भावी नागरिक आहेत. जिजाऊ ज्ञानमंदिर ही शाळा व या शाळेचे संचालक ज्ञानोबा जोगदंड सर आपल्या जिजाऊ परिवाराच्या माध्यमातून तज्ञ व अनुभवी शिक्षकांच्या प्रामाणिक प्रयत्नातून विद्यार्थ्यांना क्वालिटी शिक्षण देतात. मुलांनो ! चांगला अभ्यास करा. गुरुजनांचा आदर करा. चांगले शिक्षण घेऊन आपल्या क्षेत्रात चांगला नावलौकिक मिळवा. डॉक्टर , इंजिनिअर , अधिकारी , आमदार, खासदार, होण्याआधी चांगला माणूस बना ! असे प्रतिपादन एम.डी. रेडिओलाजिस्ट डॉ. श्रीहरी बुडगेमवार यांनी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित बक्षिस वितरण कार्यक्रमात केले. दि. २१ ते २५ जानेवारी दरम्यान जिजाऊ क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन शाळेत करण्यात आले होते. या विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धक विद्यार्थ्यांना व संघाला २६ ते २७ जानेवारी रोजी प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत योग्य बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

सलग चार दिवस आयोजित केलेल्या विविध स्पर्धांची व स्पर्धक विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्याने सदरील बक्षिस वितरण दोन दिवसांच्या कार्यक्रमात घ्यावे लागले. विविध क्रिडास्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धानंतर बक्षिस वितरण कार्यक्रमात देशभक्तीपर गीते, नृत्यस्पर्धा , बालनाटिका , लावण्या , लोकगीते फॅशन शो देशभक्त व घोषवाक्य वाचन आदी विविध गुणदर्शन कार्यक्रम दोन दिवस घ्यावा लागला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक ज्ञानोबा जोगदंड सर तर प्रमुख उपस्थितीत मुख्याध्यापक जगदीप जोगदंड सर तसेच अतिथी म्हणून पंचायत समिती मुखेडचे शिक्षण विस्तार अधिकारी बाळासाहेब कदम सर , केंद्रप्रमुख शेळके सर , ज्येष्ठ सेवानिवृत शिक्षक साधू मुळके सर , सुप्रसिद्ध युवा सराफा व्यापारी पवन पोतदार , ज्येष्ठ पत्रकार शिवाजी कोनापूरे सर तर दुसऱ्या सत्रात एम.डी. रेडिओलॉजिस्ट डॉ. श्रीहरी बुडगेमवार , पत्रकार शिवकुमार बिरादार , प्रा. मिलींद गायकवाड सर , तर तिसऱ्या सत्रात राजे छत्रपती अकॅडमीचे संचालक ज्ञानेश्वर डुमणे पाटील , कृषी अधिकारी दिगांबर शेटवाड सर, पालक प्रतिनिधी म्हणून मैनोदीन शेख , चंद्रकांत गोंदलवाड सर , सौ. जायमहेत्रे ताई , देवराज पाटील मसलगेकर सर , चंद्रकांत जाधव सर भानुदास पाटील इंगोले , बालाजी इंगोले , विलासराव जुन्ने पाटील ,दिगांबर पा. इंगोले आदी मान्यवरांची उपस्थिती होती. आपापल्या वर्गशिक्षिक व शिक्षिका यांच्या मार्गदर्शनाखाली नर्सरी ते पहिली पर्यंतच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी फॅशन शो अर्थात फॅन्सी ड्रेस स्पर्धे मध्ये सहभाग नोंदवला होता. युकेजी च्या प्रियांशी , मिताली , शुभ्रा , शरयू . , आहाना शेख , मानसी भद्रे , प्रज्वल , श्रीपाद इंगोले , आर्यन चौधरी , कुणाल शेखावत आदी चिमुकले विद्यार्थी समुहनृत्यात सहभागी झाले होते. अधिराज मस्कले नांगरधारी शेतकरी , अभिनंदन गंगावणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर बनला होता. अशीच अनेक मुले विविध नेताजींच्या वेशभूषेत सहभागी झाली होती. इयता पहिली च्या कनिष्का , राजनंदिनी, आदिनाथ या विद्यार्थ्यांनी समूहनृत्य तर गणेश, आयुश , संगीता या विद्यार्थ्यांनी गीत आणि साईनाथने अभिनय सादर केला. कर चले हम फिदा ... या देशभक्तीपर गाण्यावर इयता दुसरीच्या रुद्र पेड या मुलांने भावस्पर्शी नृत्य सादरीकरण करून रडायला भाग पाडले. समर्थ बंडे, समृद्धी, आणि संचानी सुंदर अशी नाटिका सादर केली. गोविंदराज गोपनर आणि संच यांनी नृत्य सादरीकरण केले. इयता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी संदेशे आते है या गाण्यावर चैताली गोंदलवाड , पूनम चव्हाण , सुविज्ञा मुखेडकर , श्रेया श्रीमंगले श्रेया भालेराव , मोहिनी आगलावे आदी मुलींनी सुंदर नृत्य सादर केले. जिस देश मे गंगा रहता है या गाण्यावर अनाया चौधरी , आलिशा शेख , संस्कृती माकणे , आर्या श्रीरामे , फीर भी दिल है हिंदुस्थानी या गीतावर विहान चव्हाण, शुभम चव्हाण , कृष्णकांत जुन्ने, चैतन्य शिंदे , संगेवार विराज , मयुर गोंड , शौर्य गुट्टे , रितेश जमदाडे द्रोण गव्हाणे, विराट माकणे आदी विद्यार्थ्यांनी चांगल्याच टाळ्या मिळविल्या. सौ सुरेखा राठोड मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हे मोबाईलचे दुष्परिणाम दर्शविणारे , विद्यार्थ्यांच्या व मानवी मन , मेंदूवर आक्रमण करणारे घटक याचे भयानक वास्तव या नाटिकेतून सादर केले. त्यात सुमित राठोड, आरुष धनवाडे, संभाजी भोसले, गणेश आचेवाड, आकाश चव्हाण , समर्थ चिंतलवाड , स्वरा तमशेट्टे , संचिता आडे , दिव्या मुळके, गोविंदराज कदम आदी विद्यार्थ्यांनी छान पात्रे वटवून टाळ्या मिळविल्या. चौथीच्या ईश्वरी काळे या मुलीने सुंदर नृत्य सादरीकरण करून जोरदार टाळ्या मिळविल्या.

आरोही व दिविजा या मुलींनी समुह नृत्य सादर केले. तिसरीच्या दिव्या मुळके समर्थ मस्कले , सय्यद तहेमीन , पंकजा कराळे या विद्यार्थ्यांनी व्यसनाधिन तरुणाच्या संसाराचे खुप छान नाट्यमय अभिनय सादर केले. पाचवीच्या जान्हवी शिंदे व संचाने समूहनृत्य सादर केले. प्रांजल , रोहिणी या मुलींनी नृत्य सादर केले.

रिवा गायकवाड या मुलीने बरसो रे मेघा बरसो या तर उज्ज्वल गायकवाड या मुलाने पुष्पा २ मधल्या गाण्यावर चांगलीच शाबासकी मिळवली. जान्हवी शिंदे या मुलीने संदेशे आते है या गाण्यावर नृत्य करून टाळ्या मिळवल्या . वेदश्री जुन्ने , रिहान शेख यांनी गीत गायले . जाधव मॅडम व गीते मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली नर्सरी क्लासच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. अधून मधून नृत्य, नाटिका , गीत गायन आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण अशा मिश्र स्वरूपाच्या कार्यक्रमामुळे चांगलीच रंगत वाढली. विविध स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांनी बक्षिसांची अक्षरशः लयलूट केली. विविध स्पर्धेच्या माध्यमातून मिळालेल्या संधीचे विद्यार्थ्यांनी सोने केले. वंदेमातरम् गीत गाऊन कार्यक्रमाचा समारोप झाला. मुख्याध्यापक जगदीप जोगदंड यांच्या नेतृत्वात सुधाकर जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमाचा आरंभ संगीतशिक्षक सचिन सुर्यवंशी सर व विनिता चव्हाण यांच्या स्वागतगीताने झाला. कार्यक्रमाचे बहारदार असे सुत्रसंचलन परविन शेख मॅडम , सायराबानु शेख मॅडम यांनी केले. प्रास्ताविक निरोजा जगताप मॅडम यांनी केले.यावेळी विद्यार्थी पालक बहुसंख्येनी उपस्थित होते.

# नवीन साखर कारखाना व बाय प्रॉडक्ट निर्मिती करणार - कवळें गुरुजी

लोकनेता न्युज नेटवर्क

**नांदेड बाजीराव गायकवाड**

व्हि पी के उद्योग समूहातील एम व्ही के अॅग्रो साखर कारखाना कुसुमनगर वाघलवाडा चे विस्तारीकरण करून ५००० मे टन प्रती दिवस गाळप क्षमतेचा नवीन साखर कारखाना व बाय प्रॉडक्ट निर्मिती करणार असल्याचे कवळे गुरुजी यांनी सांगितले.

व्हि पी के उद्योग समूहातील एम व्ही के अॅग्रो साखर कारखाना वाघलवाडा हा कै डॉ शंकररावजी चव्हाण साहेबांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनातून कै आ लक्ष्मणरावजी हस्सेकर साहेब यांच्या अथक परीश्रमाने उभारण्यात आला.त्या कारखान्यास आता चाळीस वर्ष पूर्ण होत आले आहेत आणि तेव्हा वापरण्यात आलेली मशनरी त्याकाळात योग्य होती परंतु आता तो कारखाना चालवत असताना वारंवार अडचणी येत आहेत आणि जो साखर उतारा मिळायला हवा तो मिळत नाही.बाग्यास मध्ये रस अधिकचा जाऊन नुकसान मोठ्या प्रमाणात होत आहे आणि त्यात वापरण्यात आलेले बॉयलर कमी क्षमतेचे असून ते अधिकचा बग्यास खातात त्यामुळे आर्थिक नुकसान होत आहे आणि मनुष्यबळ अधिक लागत असल्याने उत्पादन खर्चात वाढ होत आहे आणि माघच्या चाळीस वर्षात मशनरी मध्ये मोठा बदल होऊन आता अत्याधुनिक टेक्नॉलॉजी बाजारात आली आहे त्यामूळे आधुनिक टेक्नॉलॉजीचा नवीन कारखाना उभारून त्यात साखरे सह वीजनिर्मिती, इथेनॉल,बायोगॅस या सारखे बाय प्रॉडक्ट तयार केले तरच आपल्या भागातील शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी दर देऊन आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे शक्य होणार आहे याचा विचार करून व्हि पी के उद्योग समूहाचे चेअरमन मा श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी देशभरात फिरून अनेक कारखान्यांना भेटी देऊन त्याचा अभ्यास करून नवीन कारखाना उभारण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्यासाठी सुमारे ४०० कोटी रुपये खर्च लागणार आहे त्या अनुषंगाने आर्थिक नियोजन करत असताना १०% रक्कम शेतकऱ्याकडून जमा करावी लागणार आहे आणि ३०% रक्कम स्वतः कारखानदार गुंतवणूक करणार आणि उर्वरित ६०% रक्कम बँकेकडून कर्ज घेऊन वित्त पुरवठा करून पुढील गाळप हंगामात नवीन कारखाना गाळपास सज्ज करायचा आहे.

शेतकऱ्यांकडून जी १०% रक्कम गोळा करायची आहे त्या साठी एकूण चाळीस हजार सभासद करायचे आहेत आणि सभासद ठेव रक्कम १००००/- रु प्रती एकर ठेवण्यात आली आहे.

जे ऊस उत्पादक एकरी १००००/- रु भरून सभासद होतील केवळ त्यांचाच ६० मे टन ऊस गाळपासाठी नवीन कारखान्यात जाणार आहे आणि त्या सभासदास पहिल्या वर्षी प्रती टन २००/- रु भाववाढ मिळणार आहे आणि तिथून पुढे प्रती वर्षी १००/- प्रमाणे भाववाढ मिळेल.

शेतकऱ्यांनी लक्षात घ्यावे आपण १००००/- रु भरून सभासद



झाल्यानंतर आपला एकरी ६० टन ऊस गाळपासाठी जाऊन भाव वाढी मुळे आपणास पहिल्याच वर्षी १२०००/- रु नफा मिळणार आहे त्या मुळे आपण सभासद होण्यासाठी भरलेल्या रकमेसह दोन हजन अधिक मिळतील आणि आपण कायम स्वरुपी कारखान्याचे सभासद राहाल पहिल्या वर्षी साखर उत्पादन आणि वीज निर्मिती सुरू होणार आहे त्या मुळे पहिल्या वर्षी दोनशे रुपये भाव वाढ आहे आणि त्या नंतर प्रत्येक वर्षी बाय प्रॉडक्ट चे नवीन युनिट तयार होतील आणि कारखाण्यावरील कर्जाचे ओझे हळू हळू कमी होणार असल्याने प्रती वर्षी शंभर रुपये भाव वाढ मिळेल त्यामूळे रेगुलर दरापेक्षा पाचशे रुपये भाव वाढ होणार आहे.ज्या लोकांकडे अधिकचा पैसा आहे अश्या व्यक्तींनी कारखान्याकडे गुंतवणूक(फिक्स डीपॉजीट)केल्यास त्यांना द.सा.द.शे १५% व्याज मिळणार आहे.आपल्या भागातील शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करून शेतकऱ्यांमध्ये आर्थिक क्रांती घडवण्याच्या दृष्टिकोनातून या युनिटची उभारणी करण्याचा मानस उद्योग समूहाचा आहे तरी कार्यक्षेत्रातील उमरी,धर्माबाद,नायगांव,भोकर आणि बिलोली या तालुक्यातील शेतकऱ्यांना सभासद होण्याची संधी प्रथम असणार आहे आणि एकूण केवळ चाळीस हजार सभासद करून घेण्याचे नियोजन आहे त्यामुळे इच्छुक शेतकऱ्यांनी या सुवर्ण संधीचा लाभ घेण्यासाठी विलंब करू नये कारण चाळीस हजार सभासद नोंदणी पूर्ण झाल्या नंतर आपण प्रयत्न करून सुद्धा आपणास सभासद करून घेता येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कार्यक्षेत्रातील सभासद नोंदीचा कालावधी पूर्ण झाल्या नंतर कर्यक्षेत्राबहेरील शेतकऱ्यास सभासद नोंदीची अनुमती दिली जाणार आहे त्यामुळे आपल्या भागातील शेतकऱ्याने आपली सभासद होण्याची रक्कम आपल्या जवळच्या व्हि पी के पथसंस्थेच्या शाखेत भरणा करून आपली सभासद नोंदणी करावी किंवा ज्या शेतकऱ्यांचा ऊस गाळपासाठी येणार आहे अश्या व्यक्तींनी आपली सभासद नोंदणीची रक्कम ऊस बिलातून कपातीची संमती आपल्या गटातील कृषी सहाय्यक यांच्याकडे द्यावी आणि आपल्या भागातील शेतकऱ्यांचे आर्थिक भवितव्य घडविणाऱ्या या ऐतिहासिक कामात आपला अमूल्य सहभाग नोदवावा असे अहवान उद्योग समूहाचे चेअरमन मा.श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी केले आहे.**(टिपः- आपल्याकडे असलेल्या ऊस क्षेत्राप्रमाने आपण कितीही सभासद नोंद करू शकता त्यासाठी कमाल मर्यादा ठेवलेली नाही) सावंत एस जे ऊस विकास अधिकारी**

# भोकरदन तालुक्यातील मिटर रिडर संघटनेच्या कामगारांनी दिला काम बंद करण्याचा इशारा



**मिटर रीडर कंत्राटी कामगार संघटनेचे १ फेब्रुवारीपासून काम बंद आंदोलन, महावितरण उप कार्यकारी अभियंता यांना दिले निवेदन**

लोकनेता न्युज नेटवर्क

**पारध /रमेश जाधव**

एमएसईडीसीएल मिटर रीडर कंत्राटी कामगार संघटनेने १ फेब्रुवारी पासून मिटर रीडिंग व बिल वाटपाचे काम बंद आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. या संदर्भात संघटनेने भोकरदन तालुक्यातील सर्व मिटर रीडर यांच्या स्वाक्षरी सह निवेदन महावितरणचे उप कार्यकारी अभियंता श्री चेचकर यांना २८ जानेवारी रोजी देण्यात आले. संपूर्ण महाराष्ट्रभर फॉल्टी मिटर च्या जागी स्मार्ट मीटर ( प्रीपेड मीटर) बसवण्याचे काम सुरू आहे. यामुळे मीटर रिडींग व वीज बिल वितरण करणाऱ्या कामगारावर बेरोजगारीचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. या संदर्भात संघटनेने शासन व महावितरण कडे वेळोवेळी उपोषण व निवेदनांच्या माध्यमातून त्यांच्या मागण्या मांडल्या आहेत. स्मार्ट मीटर बसवल्यानंतर ही शासनाने वयाच्या ६० वर्षापर्यंत कामगारांना रोजगाराची शाश्वती द्यावी. अशी संघटनेकडून मागणी करण्यात आली आहे, यावर अद्यापही कोणतीही चर्चा सुरू करण्यात आली नाही. स्मार्ट मीटर मीटर रीडर कामगारावर बेरोजगारीची वेळ येणार आहे असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदन देताना मीटर रीडर कामगार राजेंद्र कुमावत, कुरेश शाह, तेजराव दांडगे, शारुख शाह, दादाराव अपार, गजानन काळे, मुकीम खान, प्रभाकर थोरात, राजेश थोरात, श्रीरंग आगलावे, एकनाथ अपार, विशाल लोखंडे, मुकीम पठाण, सुफियान शाह, अन्वर शाह, फैजान शेख, मुस्तकीम शेख, काशिफ खान, कृष्णा लोखंडे, शारुख पठाण, हरिदास किरकाडे, मनोज कोल्हे दुर्गादास लक्कस आदी उपस्थित होते.

# माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी प्रयागराज महाकुंभात मौनी अमावास्येच्या दिवशी केले अमृतस्नान

लोकनेता न्युज नेटवर्क


**लोहा /विशाल घंटे**

उत्तर प्रदेशातील प्रयाग राज मध्ये महाकुंभ सुरू आहे.१३ जानेवारी रोजी सुरू झालेल्या कुंभमेळ्यात आजपर्यंत कोट्यवधी लोकांनी स्नान केले.२९ जानेवारी रोजी मौनी अमावस्याच्या दिवशी तिसऱ्या शाही स्नानाची अनुभूती कोट्यवधी घेतली.शिवसेनेचे जेष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण हे सुद्धा महाकुंभ प्रयागराज २०२५ अमृत स्नान मौनी अमावास्या २९ जानेवारी २०२५ रोजी अमृत स्नान केले.

प्रयागराज येथील कुंभमेळ्यात देश विदेशातून मोठ्या संख्येने भाविक आले.श्रद्धेच्या या संगमात साधू साधक भाविकांची मांदियाळी पाहायला मिळत आहे.उत्तर प्रदेशातील प्रयागराज मध्येङ्गगेल्या सतरा दिवसापासून महा कुंभ पर्व सुरू आहे.मौनी अमावस्येला महाकुंभात बुधवारी त्रिवेणी संगमावर कोट्यवधी लोकांनी अमृत स्नान केले.मौनी अमावास्येच्या अमृत स्नानासाठी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण, लोहा गरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा सौ.आशाताई रोहिदास चव्हाण, शिवसेना उबाठा चे युवा नेते तथा सिनेट सदस्य नवनाथ बापूसाहेब रोहिदास चव्हाण आदींनी गंगा यमुना सरस्वती च्या त्रिवेणी संगमात पवित्र स्नानाची अनुभूती घेतली. मौनी अमावस्येच्या दिवशी आठ ते दहा कोटी भाविकांचा जनसागर उसळला असून फेब्रुवारी पर्यंत महाकुंभ सुरू राहणार आहे.अशी माहिती मिळत आहे.कुंभ नगरी पासून १५ किलोमीटर दूर अंतरावर वाहने लावावी लागत असल्याची परिस्थिती पाहायला मिळत असल्याचेही अनेक भक्त सांगत आहेत.

**पूर्वीपासूनच वारकरी संप्रदाय व भक्ती मार्गाचा अवलंब करत माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी अनेकाना नवी दिशा दिली. विविध धार्मिक स्थळांना भेटी देणे,सप्ताह किर्तन, भजन,भंडारा पोथी पुराण यात रममान होत लोकांना व्यसनापासून दूर केले.संत सहवासात स्वतः राहुन मुखे रामकृष्ण हरी चा उद्धोष करत अनेकांना भक्ती मार्ग दाखवला.**

**याचाच अनूभव दरदिवशी राजकारण्यांना, समाजकारण्याना, भक्तिमार्गातल्यांना येत असतो.**



# ग्रामीण रुग्णालय उपकेंद्र धानोरा बु.येथे आ.राजेश पवार यांच्या १०० दिवसीय आरोग्य तपासणी उपक्रम शिबिर संपन्न

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**उमरी महेश पडोळ**

**उमरी:–** तालुक्यातील धानोरा बु.येथील ग्रामीण रुग्णालय उपकेंद्रात मा.आ.राजेश पवार यांच्या १०० दिवसीय आरोग्य तपासणी उपक्रम शिबिर डॉ.भारत भूषण गजबे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला आहे.या शिबिरामध्ये ६० वर्षाच्या वरील वयोवृद्धाचे बि.पी.शुगर,मोतीबिंदू, क्षयरोग, कुष्ठरोग,सांधीवात, कॅन्सर, बहिरेपना,रक्त तपासणी मासिक आजारासह अशा अनेक बिमारीची तपासणी करून गोळ्या औषध देऊन उपचार करण्यात आला आहे. .राज्याला क्षयरोगमुक्त करण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून आरोग्य सेवा संचालनालयाने १०० दिवसांची क्षयरोग निर्मूलन मोहीम सुरू केली आहे. त्याअंतर्गत राज्यभरातील क्षयरोग ऊग्णांचे निदान आणि उपचार करण्याच्या प्रयत्नांना गती देण्यात येणार आहे. नूतन वर्ष २०२५ पर्यंत



देशातून क्षयरोगाचे उच्चाटन करण्याचे केंद्र सरकारचे उद्दिष्ट आहे.

त्यांच्या पूर्ततेसाठी राज्य आरोग्य अधिकाऱ्यांनी बाधित व्यक्तींना स्वेच्छेने टीबी चाचणी करून घेण्याचे आवाहन केले आहे. त्यायोगे लवकर निदान आणि उपचार सुनिश्चित करणे शक्य होणार आहे.एखाद्या व्यक्तीमध्ये रोगाचे निदान झाल्यास तो त्वरित उपचार घेऊ शकतो व पूर्णपणे बराही होऊ शकतो.त्यासाठीच ही १०० दिवसांची मोहीम प्रारंभ केली आहे. त्याअंतर्गत लोकांनी स्वत:ची चाचणी करून घ्यावी, असे आवाहन खात्यातील वरिष्ठ क्षयरोग अधिकाऱ्याने केले आहे. राज्यात दरवर्षी सरकारी रुग्णालयात रूग्ण वाढत चाली आहे. अशावेळी प्रत्येक जिह्यात नियमित तपासणी,निदान उपक्रम राबविल्यास वाढीव प्रकरणे शोधणे आणि त्यांच्यावर वेळीच उपचारांच्यादृष्टीने लक्ष केंद्रित केल्यास ही संख्या नियंत्रणात आणणे शक्य होणार आहे. क्षयरोगाचे वेळीच निदान आणि संपूर्ण उपचार यांच्या महत्त्वाबाबत समाजात वाढलेल्या जागरूकतेमुळे क्षयऊग्णांचा लवकर शोध घेणे तसेच विविध उपचारपद्धती आणि प्रगत साधनांच्या माध्यमातून ऊग्णाला पूर्ण बरा करण्यात यश प्राप्त होऊ शकते,

असे डॉ.भारत भुषण गजबे यांनी विविध बिमारी विषयी गावातील रूग्णास माहिती सांगितले आहेत.या शिबिरात अनेक जण आरोग्य तपासणीचा लाभ घेतला आहे.यावेळी,ज्योती चंदनकर, एल.डी.तेलंगे,रवि तोडपुलवार,अजय लोखंडे,दिगांबर जगताप,ग्रामसेवक सोनसळे साहेब, पत्रकार उद्धव मामडे,रवि पांचाळ, अशोक सर्जे, माधव माणिके,धर्माजी पांचाळ, कांताबाई हातोडे,इंदुबाई झुंजारे, भिमराव कंधारे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिकांसह अनेकजण उपस्थित होते.

# पेठवडज येथे श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**नांदेड बाजीराव गायकवाड**

पेठवडज येथील श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी वतीने नेहमीच समाज उपयोगी व सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असतात.याचाच एक भाग म्हणून जिल्हा परिषद मालकीच्या पेठवडज गावाअंतर्गत सर्व शाळेतील इयत्ता पहिली ते दहावी च्या वर्गात गुणानुक्रमे पहिला, दुसरा व तिसरा आलेल्या प्रत्येक विदयार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस वितरणाचा कार्यक्रम २६ जानेवारी २०२५ रोजी पार पडला. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर बक्षिस वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करून बक्षीस वितरण करण्यात आले.या कार्यक्रमात जि.प.प्रा.शा.विठ्ठल मंदिर, गाडगेबाबानगर, पुनर्वसन, नवीआबादी, चुडाजीची वाडी था पाच प्राथमिक शाळेतील विदयार्थीचा समावेश तसेच इयत्ता पाचवी ते दहावी वर्गातील जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले आहे.श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी पेठवडज च्या वतीने गरजू लोकांसाठी मदतीचा हात देण्याचे कार्य चालू आहे. सोसायटीच्या अध्यक्षा सौ. सुनिता अशोकराव डावकोरे व तांत्रिक सल्लागार श्री अशोक शामराव डावकोरे यांच्या कडून पेठवडज येथे अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. भविष्यातील विकासाचे सुक्ष्म नियोजन सोसायटी मार्फत करण्यात येत आहे. सदरील कार्यक्रमाला पेठवडज चे सरपंच प्रतिनिधी दत्ता गायकवाड, उपसरपंच प्रतिनिधी खुशाल राजे शालेय




व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेश्वर राजे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख आबासाहेब नाईक , बालाजी फिल्डवेल सोसायटी चे तांत्रिक सल्लागार अशोक शामराव डावकोरे सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन व्यंकटराव पांढरे तंटामुक्ती अध्यक्ष श्री करेवाड, माजी अध्यक्ष श्री पांडुरंग कंधारे माजी शिक्षक श्री डावकोरे संभाजीराव, सोनाजी गायकवाड, ज्येष्ठ स्वातंत्र सैनिक व्यंकटी इटकापल्ले, पोलिस पाटील गोविंद ठाकूर, शिवाजीराव घोरपडे, जिल्हा परिषद हायस्कूल पेठवडज चे मुख्याध्यापक माने सर यांच्या सह सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी,घोरपडे सर, अविनाश मेकवाड, अंगणवाडी मदतनीस मंगलबाई पिराजीराव गव्हाणे यांच्या सह कार्यकर्त्यां उपस्थित होत्या तसेच गावातील इतर जेष्ठ नागरिक महिला मंडळी यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीच्या माध्यमातून करण्यात येत असलेल्या कामासाठी अध्यक्षा सौ सुनिता अशोकराव डावकोरे व तांत्रिक सल्लागार श्री अशोक शामराव डावकोरे साहेब याचे सर्वत्र कौतुक होत आहे.





**नांदेड जिल्हातील व्हीपीके बँकेचे नांव सातासमुद्रापलीकडे पोहचले आहे.३० जानेवारी २०२५ रोजी लोणावळा येथे बँको ब्लू २०२४ ह्या पुरस्कारांचा सन्मान स्वीकारताना संस्थेचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी व सन्माननीय संचालक, कर्मचारी वृंद समवेत चे क्षण.(लोकनेता न्युज नेटवर्क लोणावळा)**

# यशवंत प्राथमिक माध्यमिक ज्युनिअर कॉलेज उमरी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**उमरी महेश पडोळे**

उमरी :-श्री लालबहादूर शास्त्री शिक्षण संस्था उमरी संचलित यशवंत प्राथमिक माध्यमिक ज्युनिअर कॉलेज वार्षिक स्नेहसंमेलन सांस्कृतिक अविष्कार कला गुणांचा कार्यक्रम आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्था सचिव मा.पं.सभापती मा.शिरिषभाऊ देशमुख गोरठेकर उद्घाटक शिक्षण अधिकारी नंदकुमार कुलकर्णी,हणमंत पाटील कुदळेकर,बेळकोणे सर,रंगरेज मॅडम,प्राचार्य बि.जी. जाधव सर,दत्ता पाटील कुदळेकर, पत्रकार उद्धव मामडे,बंडू यम्मेवार, पत्रकार रावसाहेब जाधव, अशोक झडते,लखमोड सर,हणमंत पाटील, प्रकाश पाटील यांच्या उपस्थितीत कै.बाबासाहेब देशमुख कै.बापूसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पुजन व दिप प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.यशवंत कॉलेज च्या वतीने आलेल्या मान्यवरांच शाल श्रीफल देवून सत्कार करण्यात आला.यावेळी,अनेक मान्यवरांचे




भाषणे झाली शि.अ.नंदकुमार कुलकर्णी म्हणाले की,मराठी सांस्कृतिक कार्यक्रमांचा जगातील परंपरेतील महत्व वाढत आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीचं विश्वात विस्तार होतं आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील विविधता, परंपरा आणि कला-संगणकांच्या विकासातील गौरवमय भागांचा तळब घेतला जाईल.मराठी साहित्याच्या खजिन्या, अविस्मरणीय मार्गदर्शक ग्रंथ, आधुनिक कार्यांचं उल्लेख केलं जाईल.

महाराष्ट्राच्या साहित्यिक धरोहरातील महत्त्वाच्या लेखकांचं उल्लेख केलं जाईल, ज्यांनी भारतीय सिनेमावर आपली चिन्ह ठेवली आहे.शिरिषभाऊ यांनी संबोधित केल की,प्रत्येक विद्यार्थ्यांत एक कला गुण लपव आहे ते बाहेर काढण्यासाठी या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून बाहेर निघत यातूनच कलाकार घडतो त्याचा विकास होतो तसेच शिक्षणाचा पण होतो यात विद्यार्थांना घडवण्याच काम शिक्षक वृंद करत असतात कॉलेज मध्ये शिक्षणासह कुठे काय कमी पडत असेल

तर अधिकारी पालकांनी सांगावेत तिन उणीव भरून काढु विध्यार्थी उज्वल भविष्याच प्रतिक आहे असेही ते म्हणाले.यावेळी,या सांस्कृतिक कार्यक्रमास बहुसंख्य विद्यार्थी पालक शिक्षक वृंद महिला बाल गोपाल मान्यवर उपस्थित राहून लावणी कोळी नृत्य, बंजारा नृत्य हिंदी मराठी चित्रपटातील सुपर हिट गाण्याचा चिमुकल्याच बहारदार नृत्याचा आनंद घेतला आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री बी जी जाधव सर,उपमुख्याध्यापक श्री बेंद्रे सर, पर्यवक्षक श्रीकरपे सर व सर्व शिक्षकवृंद यांनी अथक परिश्रम केले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. श्री एन.टी.मोरे सर यांनी केले व सूत्रसंचालन श्री जी.जी. चव्हाण सर व श्रीमती व्ही.पी.गाडे मॅडम यांनी केले.

# पारध मध्ये कोणी वाचनालय देता का वाचनालय? पारध गाव मोठे पण वाचनालय कुठे?

## भल्या मोठ्या लोकसंख्येच्या गावाला वाचनालयही मिळेना? त्यासाठी पारध (बु) येथील युवकांचे ग्रामपंचायतीला निवेदन

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**पारध /रमेश जाधव**

शासनाचा वाचन संस्कृती संवर्धनासाठी प्रेरणादायी असलेला गांव तेथे ग्रंथालय उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतींनी सार्वजनिक ग्रंथालय साकारणे गरजेचे आहे. परंतु याकडे दुर्लक्ष होत असून बहुसंख्य ग्रामपंचायत, गावात सार्वजनिक ग्रंथालये नाहीत.

''राज्य शासनाची गाव तिथे ग्रंथालय या योजनेची मागील काही महिन्यांपूर्वी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी घोषणा केली होती की गाव तिथे ग्रंथालय ही योजना आता मोठ्या प्रमाणावर अमलात आणणार आहोत आणि त्याप्रमाणे सर्वांना आदेशही देण्यात आले होते. परंतु ग्रामपंचायतीद्वारे



याकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे.

त्याच अनुषंगाने भोकरदन तालुक्यातील पारध (बु) हे एक मोठे गाव म्हणून ओळखले जाते. परंतु अजून देखील या गावातील युवकांना वाचनालय उपलब्ध नाही . पण हीच खंत गावातील नवतरुण युवक व्यक्त करत आहे. त्याच अनुषंगाने पारध ( बु) येथील युवकांनी शासनाच्या गाव तिथे ग्रंथालय या योजनेच्या माध्यमातून गावात ग्रंथालय सुरू करावे यासंबंधीचे निवेदन अनेक विद्यार्थ्यांच्या सहीनिशी ग्रामपंचायत पारद (बु ) दिले असून याबाबत पाठपुरावा करण्याची विनंती करण्यात आली आहे.ङ्गराज्य शासन, ग्रामविकास विभाग यांच्या शासन निर्णय व राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानाच्या माहिती पुस्तिकेत, तसेच केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीतून लोकोपयोगी विकास कामाच्या यादीतही सार्वजनिक वाचनालय हे प्रमुख उद्देश आहे. वाचन संस्कृतीपासून शालेय विद्यार्थी वंचित राहू नयेत, यासाठी ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या वित्त आयोगाच्या अनुदान माध्यमातून गावांमध्ये सार्वजनिक ग्रंथालय तयार करता येईल.

यासाठी ग्रामपंचायतींनी ग्रंथालय साहित्यासाठी आराखड्यात स्वतंत्रपणे तरतूद करावी, असे निवेदनात नमूद केले आहे. या निवेदनाचा पाठपुरावा ग्राम पंचायतीने करावा आणि युवकांनी वाचनालय उपलब्ध करण्यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घ्यावा हीच विनंती गावातील युवकांनी केली त्यामधे किशोर लोखंडे, सागर लोखंडे, राजु देशमुख, सागर तेलग्रे,अमोल लोखंडे, आदेश कोथलकर, सागर देशमुख, विकास लोखंडे, यानी निवेदनाच्या माध्यमातून ग्रामसेवक संजय पुरी व सरपंच बाबुराव काकफळे यांच्या कडे निवेदन देण्यात आले.

# गोजेगाव येथे नरसिंग महाराज प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा




■ लोकनेता न्युज नेटवर्क

**मुखेड शिवकुमार बिरादार**

मुखेड तालुक्यातील गोजेगाव येथे नरसिंग महाराज प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठलराव सूर्याजीराव पाटील गोजेगावकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलेङ्गध्वजारोहण कार्यक्रम तदनंतर गावातून संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आषाढी पालखी सोहळा देखाव्याचे सादरीकरण विद्यार्थ्यांच्या वतीने करण्यात आली असून गावातून प्रभात फेरी काढण्यात आली विद्यार्थ्यांनी लेझीम वर सुंदर नृत्य सादर केले असून यावेळी माऊली पालखी सोहळा खूपच विविध देखाव्यासह रोमांचक आकर्षक ठरला टाळ, दिंडी, ज्ञानेश्वर माऊली नामाच्या गजरात विविध अभंगवाणीतून गोजेगाव नगरी दुमदुमली होती नरसिंग महाराज प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमात विविध भाषणे घेण्यात आली शाळेतील सर्व शिक्षकांनी खूप परिश्रम घेऊन हा प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम यशस्वी पार पाडला असुन यावेळी श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष.तथा मुख्याध्यापक विठ्ठल सूर्याजी पाटील गोजेगावकर. श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ सचिव. भगवान सूर्याजी पाटील गोजेगावकर. उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठलराव सूर्याजीराव पाटील गोजेगावकर यांनी सर्व शिक्षकांचे कौतुक केले असुन तसेच उपस्थित सर्व गावकऱ्यांनीही उपस्थित शिक्षककावर अभिनंदनाचा वर्षाव केला.

# सुरंगळी गावच्या सरपंच पदी सौ सुनिता संतोष काळे यांची निवड



■ लोकनेता न्युज नेटवर्क

**भोकरदन/राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील सुरंगळी येथे आज नवनिर्वाचित सरपंच सुनीता संतोष काळे यांच्याकडे सरपंच पदाचा पदभार देऊन सर्व ग्रामपंचायत सदस्य यांनी एकमुखी निर्णय घेऊन सरपंच पद पदी निवड करण्यात आली आहे सविस्तर वृत्त असे की भोकरदन तालुक्यातील सुरंगळी येथे एसटी महिला सरपंच पदावर विराजमान होत्या परंतु शासनाच्या अध्यादेशानुसार सरपंच पद रद्द करण्यात आले होते तसेच जालना जिल्हा परिषदेचे सी ईओ श्रीमती वर्षा मीना, व भोकरदन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री गजानन सुरडकर यांच्या आदेशानुसार आज सुरंगळी येथील सरपंच पदाचा पदभार हे सुनीता संतोष काळे यांच्याकडे सोपविण्यात आले आहे माजी सरपंच आशु कुमारी रामेश्वर दांडगे ग्रामसेवक एस आर पाजगे,माजी सरपंच एकनाथ भराड,ग्रामपंचायत सदस्य सौ नयना ज्ञानेश्वर वानखेडे, चंद्रकलाबाई देविदास जाधव, सुशील देविदास जाधव विश्वनाथ गोविंदा दांडगे शमा बी रुबाब शेख , डॉ संजीव पाटील,पत्रकार सुभाष वरपे, संतोष काळे , दिनकर काळे, भाऊसाहेब काळे, गणेश मोठे, दिलीप वरपे, धनराज काळे, घनश्याम बोर्डे, शे एजाज, प्रल्हाद काळे, संदीप दांडगे, अरूण गवळी, शे समद, यांच्यासह मोठ्या संख्येने आजी माजी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# राळेगण सिद्धी,हिवरे बाजार व पाटोदा च्या धर्तीवर आमदार कायंदे यांचे उंबरखेड ग्राम आदर्श करूया

## वनश्री जनाबापू मेहेत्रे यांचे उंबरखेड वासीयांना आवाहन..

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**देऊळगाव राजा (ज्ञानेश्वर बुधवत) :–**

''गाव करी ते राव न करी'', ''तुझं गावच नाहीका तीर्थ तू उगीच कशाला फिरतो'' या उक्तीनुसार आपले गाव आपली ओळख व अस्मिता मानून गावातील प्रत्येकाच्या सुख,शांती, आनंद,समाधान,आरोग्य स्वावलंबन व अपेक्षित उन्नतीसाठी अण्णा हजारे यांचे राळेगणसिद्धी, पोपटराव पवार यांचे हिवरे बाजार,पेरे पाटील यांच्या पाटोदा च्या धर्तीवर सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार यांचे जन्मगाव ग्राम उंबरखेड आदर्श गाव निर्माण करूया.

यासाठी जात धर्म पंथ पक्ष संप्रदाय याच्या पलीकडे जाऊन सर्वांनी आपापले निरपेक्ष योगदान द्यावे असे आवाहन जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते वनश्री जनाबापू मेहेत्रे यांनी केले.

देऊळगाव राजा येथील समर्थ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दिनांक २२ ते २८ जानेवारी करण्यात आले होते.या शिबिराच्या समारोपीय सत्रात प्रमुख वक्ते म्हणून वनश्री मेहेत्रे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. सदानंद डोईफोडे,मा. सुजित गुंडे,मा.गजानन कायंदे,मा.रामदास मांटे, प्रा.योगेश जाधव,मा. विकास काकड,मा. भीमराव कंकाळ,राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी यांच्या हस्ते झाले.




या प्रसंगी वनश्री मेहेत्रे यांनी शिक्षण आरोग्य पर्यावरण व संस्कृती संवर्धन,जलसंधारण व्यसनमुक्ती आदी विषयांवर मोलाचे मार्गदर्शन करून युवकांनी आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून शिक्षकांच्या मार्गदर्शनात धेय्य साध्य करण्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख वक्ते श्री सुजित गुंडे यांनी सायबर क्राईम पासून स्वतःचा बचाव कसा करायचा याच्या मार्मिक टीप्स देऊन ऑनलाईन व्यवहारात सावधानता बाळगण्याचे सांगितले.

तर मुख्याध्यापक श्री.रामदास मांटे यांनी उंबरखेड गाव आदर्श करण्यासाठी आपण सर्वजण एक संघपणे कार्य करू असे अभिवचन दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षल नागे यांनी केले तर उपस्थितांचे आभार भागवत गायके यांनी मानले.कार्यक्रमास एन.एस.एस.शिबिरार्थी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शाळेतील आगळा वेगळा उपक्रम

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**किनवट प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोंडजेवली तांडा येथील शिक्षकांनी आगळावेगळा(केस कर्तना चा) उपक्रम राबवून आदर्श घडविला. कोणत्याही व्यक्तीचे व्यक्तिमत्व उठून दिसायचं असेल तर बाह्यरूप तसेच आंतररूप दोन्ही महत्त्वाचं असतात . आंतररूपासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम आहे तर बाह्यरूपासाठी दिलेल्या शिक्षणाचा योग्य वापर करून टापटीप व नीटनीटके राहणं महत्त्वाचं. हाच उद्देश मनात ठेऊन चक्क मुलांचे केस कटिंग शाळेमध्येच करून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे धडे दिले. अतिशय दुर्मिळ व आदिवासी भागात असणारी व तेलंगणा सीमेजवळ असणारी शाळा म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा



गोंडजेवली तांडा. ता.किनवट.जि.नांदेड येथील विद्यार्थ्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची व भौतिक सुविधांची अभाव असल्यामुळे विदयार्थ्यांना स्वच्छतेचा अनोखा धडा दिला निटनेटकेपणामुळे जीवन यशस्वी आनंदी होण्यास मदत होते यामुळे शालेय जीवनापासून हे मूल्य दैनंदिन जीवनाचा एक भाग बनले पाहिजे... म्हणून सुंदर मी होणार, असं प्रत्येक जण म्हणत असतं; पण सगळं जग सुंदर झालं पाहिजे, शाळेतील विद्यार्थी स्वच्छ व सहज सुंदर दिसायला हवीत, यासाठी अस्वच्छ राहणाऱ्या मुलांना सुंदर व स्वच्छतेचा धडा देण्यासाठी एक उपक्रम राबविण्यात आला. खूप दिवसांच्या निरीक्षणातून असे लक्षात आले होते की विद्यार्थी अस्वच्छतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे केसांची निगा, नखांची निगा याकडे विद्यार्थी दुर्लक्ष करत असल्याचे समजले तेंव्हा शाळेतील शिक्षक दिलीप वाघमारे यांनी गावातील केस कर्तनकार संतोष दंतपल्ले व विजय औनुरवार यांची मदत घेत विद्यार्थ्यांचे केस कटिंग केले. तेंव्हां तीच मुलं खूप सुंदर दिसत होती. ज्या मुलांना अस्वच्छ राहण्याची सवय होती त्यांना टापटीप पाहून पालकांनाही आनंद झाला. इयत्ता पहिलीत शिकणाऱ्या मुलाला पाहून त्याची आई त्याला म्हणाली,अरे वाह आमचा गब्बर तर हिरोच दिसायला लागला. स्वच्छतेच्या या सवयी विद्यार्थी कायम लक्षात ठेवतील व नक्किच त्यांच्यामध्ये एक सकारात्मक बदल दिसून येईल व आरोग्य सुद्धा चांगले राहील अशी भावना येथील शिक्षकाने व्यक्त केली.

# सेंद्रिय शेतीतून महिला शेतकरी सबलीकरण काळाची गरज-प्रा किशोर सूर्यवंशी



■ लोकनेता न्युज नेटवर्क

**माहूर : प्रतिनिधी**

-आरोग्याचे तत्त्व हवा, माती, धान्याची रोपे, पशू, पक्षी, मनुष्यप्राणी व निसर्गचक्र यांचे आरोग्य वाढविणे हा सेंद्रिय शेतीचा उद्देश आहे. सेंद्रिय शेतीचा अवलंब केल्यास रोगप्रतिकार शक्ती वाढून मानवाचे आरोग्य वाढते व महिला सबलीकरण होण्यास मदत होते.विविध क्षेत्रातील अनेक प्रगतीची शिखरे महिलांनी पादाक्रांत केली आहेत. या महिला शक्तीने आपल्या अंगभूत गुणांचा वापर कोणत्याही क्षेत्रात केल्यास त्या क्षेत्राच्या विकासाला एक नवीन दिशा प्राप्त होते. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता शेती, उद्योग आणि सेवा या तीन क्षेत्रांचा विकास हा देशाच्या आर्थिक विकासासाठी महत्त्वाचा आहे. यातील सर्वच क्षेत्रात महिलांचा सहभाग हा आर्थिक विकासाला वेग प्राप्त करून देणारा ठरतो. आज अनेक क्षेत्रात महिला वर्ग कार्यरत आहे, पण त्यांची संख्या वाढणे महत्त्वाचे आहे. म्हणजेच महिलांच्या अंगी असणार्या विविध गुणांचा उपयोग वस्तू आणि सेवांच्या उत्पादनात होऊन त्यातून राष्ट्रीय विकासाला हातभार लागण्यास अथवा आर्थिक विकासाची चाके अधिकाधिक गतिमान होण्यास मदत होईल. असे प्रतिपादन युवा वक्ते प्रा.किशोर सूर्यवंशी यांनी बोलताना व्यक्त केले.सेवा संस्था च्या अंतर्गत शाश्वत कापूस कार्यक्रम स्वाश्रयी महिला सेवा संघ माहूर च्या वतीने आयोजित महिला शेतकरी मेळावा आणि शेती माहिती चित्र प्रदर्शन कार्यक्रम मौजे कासारपेठ ता माहूर या ठिकाणी पार पडला. सेंद्रिय शेती व महिला सबलीकरण काळाची गरज या विषयावर प्रा किशोर सूर्यवंशी यांनी सखोल माहिती देऊन रोजगाराच्या संधी बाबत माहिती दिली. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून सरपंच श्री.चरणसिंग राठोड, मराठवाडारत्न प्रा किशोर सूर्यवंशी,पशु वैद्यकीय अधिकारी डॉ विष्णू कस्तुरे,वैद्यकीय अधिकारी डॉ उषा देशमुख प्रकल्प समन्वयक शैलेंद्र कांबळे व संघपाल रणवीर,कृषी तज्ज्ञ ऋषिकेश बोळे मदन जाधव, गजानन राठोड सर,दादाराव चव्हाण, विलास चव्हाण प्रा प्रवीण बिरादार,शेखर दवणे, मयुरी बेहेरे,कॉटन कनेक्ट चे सर्व पदाधिकारी व प्रयोगशील शेतकरी सिंधुताई घोटकर आणि श्री.विनायक गव्हाणे याबरोबरच १६ खेड्यातील असंख्य शेतकरी महिला उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे प्रास्तविक सचिन कदम, सुत्रसंचलन माया चव्हाण आणि पूजाताई भगत यांनी तर आभार चंचल बेहेरे यांनी केले.

# तहसील कार्यालयातच भरविला निराधारांचा दरबार.



## तहसीलदार किशोर यादव यांनी एका छताखाली केला निराधारांच्या सर्व समस्यांचा निपटारा

■ लोकनेता न्युज नेटवर्क

**श्रीक्षेत्र माहूर :राजकिरण देशमुख**

माहूर तालुक्यातील इंदिरा गांधी योजना संजय गांधी निराधार योजना श्रावण बाळ योजना सह निराधार विधवा अपंग महिलां पुरुषांना सेतू केंद्रासह इतर ठिकाणी चकरा माराव्या लागू नये म्हणून तहसील कार्यालयातच बोलावून येथे थंड पाण्याची व्यवस्था करत त्यांच्या सर्व समस्यांचा निपटारा दिनांक ३० रोजी करत कागदपत्रांच्या सर्व अडचणी सोडविण्यासाठी येथे बैठे पथकाची निर्मिती करून सर्व समस्यांचा निपटारा एकाच छताखाली केला गेल्याने सर्व आलेल्या शेकडो निराधारंनी तहसीलदार किशोर यादव यांना यांचे अभिनंदन केले आहे

धडाकेबाज निर्णय घेण्यासाठी प्रसिद्ध असलेले तहसीलदार किशोर यादव यांनी तालुक्यातील निराधार यांना अनेक वेळा आव्हान करूनही त्यांच्या अडचणीमुळे तसेच सेतू सेवा केंद्र आणि इतर कारणामुळे त्यांना आपली केवायसी हयात प्रमाणपत्रासह इतर कागदपत्रे सादर करण्यासाठी विलंब होत होता त्यामुळे त्यांनी वर्तमानपत्रांच्या माध्यमातून आवाहन करत दि ३० रोजी एकाच छता खाली सर्व समस्यांचा निपटारा करण्यात येईल असे सांगितले होते

त्यामुळे त्यांनी सर्व निराधार व्यक्तींनी तहसील कार्यालयात यावे असे आवाहन केले होते त्यामुळे सर्व निराधार अपंग वृद्धांनी तहसील कार्यालयात धाव घेतली होती तहसीलदार किशोर यादव यांच्याकडून सर्व आलेल्या निराधारांणा थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती यावेळी नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड उदय वानखेडे वैभव पांढरे रवी गुरनुले यांचे सह सर्व कर्मचाऱ्यांनी निराधारांच्या समस्या जाणून घेत निराकरण केल्याने आलेल्या सर्व निराधारानी तहसीलदार किशोर यादव यांचे आभार मानले

# गझल

सर्व बघतो..स्तब्ध असतो, ठोकळा आहेस का?
केवढे डोळे तुझे पण आंधळा आहेस का?

रोज पुतळे पूजल्याने, काय होते सांग ना?
फक्त जयजयकार करशी बावळा आहेस का?

फस्त केले सर्व काही...नजर पिंडावर तुझी
आत बाहेरून काळा कावळा आहेस का?

शर्यतीचा वेग मोठा धावणेही मान्य जर
थांबतो आता कशाला पांगळा आहेस का?

रोज वेडे होत जातो धावतो मागे तुझ्या
काय मृगजळ की अनोखा सापळा आहेस का?

एक घरटे बांधते माझ्यातुझ्या नात्यास मी
ओढ उडण्याची तुला पण मोकळा आहेस का?

देव असुनी तू किती दिसतोस माझ्यासारखा
विठ्ठला तू सांग नक्की सावळा आहेस का

**रोहिणी पांडे**
**रोही गझल**

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904